मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ । पान १

# लोकसभा निवडणुकीत विकास कामाच्या जोरावर महायुतीचे ४५ पेक्षा अधिक उमेदवार येणार..!

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरेंचा विश्वास




**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
राज्यात होणाऱ्या आगामी लोकसभा निवडणुकीत केवळ विकासकामांच्या जोरावर महायुतीचे ४५ पेक्षाही अधिक उमेदवार निवडून येणार असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पिंपरी-चिंचवडच्या वतीने (शहर-जिल्हा) निगडी येथे बुधवार दि. २१ फेब्रुवारी रोजी पक्षाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. तेव्हा खा. तटकरे बोलत होते. या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, ओबीसी प्रदेशाध्यक्ष कल्याणकाका आखाडे आदींसह पक्षाचे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खा. तटकरे यांनी शहरातील राष्ट्रवादी पक्षाचे सर्व सेल अध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, फ्रंटल तसेच बूथ कमिटी यांच्या कामकाजाची पूर्ण माहिती घेतली. पिंपरी, चिंचवड व भोसरी विधानसभा अंतर्गत येणाऱ्या सर्व एकूण बूथ, त्याची रचना याबाबत सविस्तर माहिती घेऊन सूचना दिल्या. उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहरात केलेल्या विकासकामांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. देशाचा झपाट्याने होणारा विकास तसेच राज्यात महायुतीच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून अजित पवार घेत असलेले कष्ट नाकारून चालणार नाही. त्यामुळे राष्ट्रवादी पक्षातील जास्तीत जास्त उमेदवार निवडून असनून पक्षाला बळकटी देण्यासाठी सर्वंकष प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा खा. तटकरे यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी रुपाली चाकणकर आणि सुरज चव्हाण यांनीही मार्गदर्शन केले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील लोकसभा निवडणुकीच्या सुरू असलेल्या तयारीचा सविस्तर आढावा सादर केला. बुथनिहाय सुरु असलेली तयारी, मतदार याद्या, भाग याद्या यासंदर्भात सुरू असलेली तयारी, कार्यकर्त्यांमध्ये निवडणुकीसंदर्भात असलेला उत्साह या बाबी स्पष्ट करतानाच तिन्ही विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार अधिकाधिक मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास गव्हाणे यांनी व्यक्त केला. मावळ आणि शिरूर मतदारसंघातील महायुतीचा कोणीही उमेदवार असला तरी त्याचे काम चांगल्यापद्धतीने करून विजय आपलाच होणार, अशी खात्री गव्हाणे यांनी व्यक्त केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या भोसरी, पिंपरी, चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या अध्यक्षांनी यावेळी निवडणुकीच्या तयारीची सखोल माहिती दिली. तसेच विविध सेलच्या अध्यक्षांनी निवडणुकीच्या तयारीबाबतचा आढावा सादर केला. या बैठकीस माजी आ. विलास लांडे, माजी महापौर योगेश बहल, मंगला कदम, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर,माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, माजी महापौर अपर्णा डोके, ज्येष्ठ नेते मोहम्मद भाई पानसरे, शहर कार्याध्यक्ष राहुल भोसले, शाम लांडे, फजल शेख, प्रशांत शितोळे, मोरेश्वर भोंडवे, मा.विरोधी पक्षनेते राजू मिसाळ,संतोष बारणे, भोसरी विधानसभा पंकज भालेकर, पिंपरी विधानसभा अध्यक्ष विशाल काळभोर, चिंचवड विधानसभा अध्यक्ष विनोद नढे, महिला निरीक्षक शितल हगवणे, युवक प्रदेश उपाध्यक्ष विशाल वाकडकर, प्रवक्ते तथा मुख्य सरचिटणीस विनायक रणसुभे, माजी नगरसेवक वसंत बोराटे, मयूर कलाटे, संजय वाबळे, विक्रांत लांडे, संजय नेवाळे, राजू बनसोडे, माजी नगरसेविका वैशाली काळभोर, अमिना पानसरे ,बन्सी पारडे, निलेश पांढारकर, प्रज्ञा खानोलकर, संगीता नानी ताम्हाणे, मनोज खानोलकर, विनया तापकीर, खजिनदार दीपक साकोरे, युवक अध्यक्ष शेखर काटे, युवती अध्यक्ष वर्षा जगताप, यश साने, शोभा पगारे, ज्ञानेश्वर कांबळे, राजेंद्रसिंग वालिया, राजन नायर, शीला भोंडवे, सचिन औटे, संदीप चिंचवडे, निलेश डोके, सतीश दरेकर, राजेंद्र जगताप, अतुल शितोळे, राजेंद्र साळुंखे, प्रकाश सोमवंशी , नारायण बहिरवाडे, विजय लोखंडे, प्रसाद कोलते, तुषार ताम्हाणे,अक्षय माच्छरे, प्रतीक साळुंखे, सागर बोराटे, संजय औसरमल, देविदास गोफने, गंगा धेंडे, धनंजय भालेकर, विनोद वरखडे, प्रदीप तापकीर, अकबर मुल्ला,युसुफ कुरेशी, श्रीकांत कदम, किरण देशमुख, महेश झपके,कविता खराडे, संगीता कोकने,सारिका पवार, उज्वला ढोरे, ज्योती गोफने, अरुण पवार, शिवाजी पाडूळे, पुष्पा शेळके, पौर्णिमा पालेकर, पल्लवी पांढरे, सुनीता अडसुळे, ॲड.संजय दातीर, बाबाजी खामकर, निर्मला माने, सचिन वाल्हेकर, बापू कातळे, तुकाराम बजबळकर, संजय जगताप, प्रदीप गायकवाड, अमोल भोईटे, मिरा कुदळे, आशा शिंदे, विशाल आहेर, विजय घोडके, उत्तम आल्हाट, प्रकाश आल्हाट, तानाजी खाडे, रवींद्र सोनवणे, पवन खराडे, शरद भालेकर, रामभाऊ तावरे, यांच्यासह अनेक आजी माजी नगरसेवक, नगरसेविका व सेल अध्यक्ष तसेच विभाग प्रमुख, केंद्र प्रमुख, बूथ अध्यक्ष,पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सदर बैठकीचे प्रास्ताविक पक्ष प्रवक्ते तथा मुख्य सरचिटणीस विनायक रणसुभे व सूत्रसंचालन खजिनदार दीपक साकोरे यांनी केले.

# विचारांच्या कक्षा ओलांडून भारत महासत्ता होण्यासाठी पुढाकार घ्या

## शहर भाजपातर्फे विविध ११ आघाडयांची जम्बो कार्यकारिणी जाहिर

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** देशाच्या युवाशक्तीला दिशा देण्याची जबाबदारी सर्वांची आहे. नागरिकांच्या वैयक्तिक सहभागातूनच राष्ट्र उभारणी होते. विकसित भारताच्या संकल्पनेला प्राधान्य देऊन उद्दिष्ट पूर्तीसाठी विकसित भारत २०४७' संकल्पनेसाठी प्रत्येकाने आपल्या विचारांच्या कक्षा ओलांडून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना पुन्हा पंतप्रधानपदावर विराजमान करून भारत महासत्ता होण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) आयोजित नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा आचार्य अत्रे सभागृह, नेहरूनगर येथे मंगळवारी पार पडला. यावेळी, भाजपा शहराध्यक्ष शंकरभाऊ जगताप यांच्या हस्ते भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा, भाजपा महिला मोर्चा, सांस्कृतिक प्रकोष्ठ, बेटी बचाव बेटी पढाओ, किसान मोर्चा, वैद्यकीय प्रकोष्ठ, दिव्यांग सेल, ट्रान्सपोर्ट सेल, अल्पसंख्यांक मोर्चा, जैन प्रकोष्ठ, कामगार मोर्चाच्या जम्बो कार्यकारिणी जाहिर करण्यात आल्या. तसेच, विविध प्रकोष्ठचे ४५० हून अधिक नवनियुक्त पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देवून सन्मानित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी, प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, आमदार महेशदादा लांडगे, आमदार उमाताई खापरे, मावळ लोकसभा संयोजक सदाशिव खाडे, वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडेगिरी, अजय पाताडे, संजय मंगोडेकर, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे, प्रदेश युवा मोर्चा सचिव अजित कुलथे, चिंचवड विधानसभा प्रमुख काळुराम बारणे, प्रदेश सचिव तेजस्विनी कदम, माजी महापौर आर. एस. कुमार, मंडल अध्यक्ष निलेश अष्टेकर, सोमनाथ भोंडवे, नगरसेविका शारदा सोनवणे, युवा मोर्चा सरचिटणीस दीपक नागरगोजे, सतीश नागरगोजे, जैन प्रकोष्ठ संयोजक संदेश गदिया, कविता हिंगे, माजी युवा मोर्चा अध्यक्ष संकेत चौंधे, किसान मोर्चा चिटणीस प्रेमनाथ बोराटे, बेटी बचाव बेटी पढाव संयोजिका प्रीती कामतिकर, ट्रान्सपोर्ट सेल अध्यक्ष दीपक मोढवे, अल्पसंख्यांक आघाडी प्रदेश सचिव जमीर मुल्ला, जमील औटी, सनदी लेखा प्रकोष्ट बबन जंगले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# सर्वसामान्य लोकांमध्ये जाऊन त्यांचे प्रश्न समजून काम करणे गरजेचे

## कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य लोकांमध्ये जाणे गरजेचे : आमदार रोहित पवार

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शरद पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य लोकांमध्ये जाणे गरजेचे आहे. लोकांचे प्रश्न समजून घेऊन काम करणे गरजेचे आहे असे आमदार रोहित पवार यांनी आज पिंपरी चिंचवड पक्ष कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी पत्रकारांच्या विविध प्रश्नांना रोहित पवार यांनी उत्तरे दिली. यावेळी त्याचबरोबर पिंपरी चिंचवड शहरातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली, त्यानंतर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेऊन विविध प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याची मागणी केली.आयोजित पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी राज्यात वाढत चाललेल्या गुन्हेगारीवर भाष्य करताना राज्याचे गृहमंत्री फडणवीस हे विरोधकांचे पक्ष व कुटुंबे फोडण्यात एवढे व्यस्त झालेत की त्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्याकडे लक्ष देण्यास वेळ नाही. त्यामुळे राज्यात गुन्हेगारी बोकाळली असून फडणवीसांनी गृहमंत्री पदाचा त्याग करावा. त्यात अजित पवारांनी घेतलेला निर्णय कुटुंबियांनाच आवडला नाही तर जनतेला कसा आवडेल? त्याच उत्तर याच निवडणुकीत मिळेल. शिवाय भाजप ला लोकसभा निवडणुकीसाठी अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांची गरज असूनही जागावाटपामध्ये त्यांना मोजक्या जागा दिल्याने आतापासूनच अजित पवार आणि शिंदे यांना भाजपने दाबण्यास सुरवात केली आहे, विधानसभा निवडणुकीपर्यंत तर यांना युतीमध्ये काहीच किंमत राहणार नाही. असे रोहित पवार यांनी सांगितले. अजित पवार यांचे सख्खे पुतणे युगेंद्र पवार यांनी पवार साहेबांसोबत राहण्याचा निर्णय घेतला असेल तर त्यांचं स्वागत व मनापासून अभिनंदन करायला पाहिजे. आम्ही वयाने लहान असूनही आम्हाला कुणाबरोबर राहायचं हे कळतंय आणि ते जनतेलाही आवडतंय ते पवार साहेबांच्या आजच्या आंबेगाव येथील जाहिर सभेतून आणखी स्पष्ट होईल. पिंपरी चिंचवड मधील पदाधिकाऱ्यांनी एकनिष्ठतेने काम करून शहरातील विविध प्रश्न जनतेसमोर मांडण्याचे काम करावे त्यासाठी शहर कार्यकारणी मध्ये अनेक तरुणांना येत्या काळात संधी देण्यात येईल असे रोहित पवार म्हणाले. महापालिकेची धन्वंतरी योजना बंद करून विमा योजना लागू करण्यात आल्याचा मुद्द्यावरून आयुक्त शेखर सिंह यांनी यांनी याबाबत तात्काळ निर्णय घेऊन धन्वंतरी योजना पूर्ववत करावी अशी मागणी रोहित पवार यांनी केली.

# पुण्याला मिळणार अतिरिक्त पाणी

## धरणाची उंची वाढवण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांचे निर्देश

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मुळशी धरणाखालील मुळशी परिसरातील गावांसह पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण क्षेत्रातील पश्चिम भागात वाढत असणाऱ्या लोकसंख्येसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे. यादृष्टीने पुढील ३० वर्षांचा विचार करून मुळशी धरणाची उंची वाढवावी. तसेच मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या टप्पा १ आणि २ च्या माध्यमातून होणाऱ्या कामांसाठी टाटा पॉवर कंपनीबरोबर सामंजस्याने उपाययोजनांवर अंमलबजावणी करावी, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिले. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयातील त्यांच्या दालनात मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना टप्पा एक व टप्पा दोन मधील अडचणी दूर करण्यासाठी बैठक झाली. त्यावेळी



त्यांनी हे निर्देश दिले. मुळशी धरणातून अतिरिक्त पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने टाटा पॉवर कंपनीचे अधिकारी सकारात्मक असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुळशी आणि पुणे परिसरातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्यासाठी मुळशी धरणाची उंची एक मीटरने वाढविल्यास अतिरिक्त पाणी उपलब्ध होऊ शकते. यासह धरणाच्या मृतसाठ्यामधील पाण्याचा वापर करता आल्यास पाण्याची वाढीव मागणी पूर्ण होईल. टाटा पॉवर कंपनीच्या सहकार्याने या कामास प्राधान्य देण्यात यावे.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, हिंजवडीसह कोळवण खोऱ्यातील गावांमध्ये येत्या तीन वर्षात पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पाणीपुरवठा योजनांची तातडीने अंमलबजावणी करावी. त्यासाठी मुळशी धरणाची उंची एक मीटरने वाढविण्यात यावी. उंची वाढविल्यामुळे पाण्याखाली जाणाऱ्या जमिनीपैकी ८० टक्के जमीन टाटा पॉवर कंपनीच्या क्षेत्रातील असून ती विनामोबदला देण्याची विनंती करण्यात यावी. उर्वरित २० टक्के जमीन शासनाच्या वतीने अधिग्रहण करावी. यासाठी जमीनधारकांना योग्य मोबदला देण्यात यावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गत मंजूर कामांबाबत टाटा पॉवर कंपनीने हरकत घेतल्याने काम थांबले होते. या कामांना वेग देण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जलसंपदा विभागास प्रस्ताव द्यावा. जलसंपदा विभागाने आवश्यक पाण्याचे आरक्षण जाहीर करून याबाबत टाटा पॉवर कंपनीला लेखी कळवावे. तसेच पौड येथील पाणीपुरवठा योजनेंतर्गत

### उपाययोजनांवर अंमलबजावणी करा

» मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या टप्पा १ आणि २ च्या माध्यमातून होणाऱ्या कामांसाठी टाटा पॉवर कंपनीबरोबर सामंजस्याने उपाययोजनांवर अंमलबजावणी करावी, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारयांनी दिलेअजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयातील त्यांच्या दालनात मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना टप्पा एक व टप्पा दोन मधील अडचणी दूर करण्यासाठी बैठक झाली. मुळशी धरणातून अतिरिक्त पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने टाटा पॉवर कंपनीचे अधिकारी सकारात्मक असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुळशी आणि पुणे परिसरातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्यासाठी मुळशी धरणाची उंची एक मीटरने वाढविल्यास अतिरिक्त पाणी उपलब्ध होऊ शकते.

उभारण्यात येणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्रासाठी 'पीएमआरडीए'ने एक एकर जागा उपलब्ध करून दिली आहे. याठिकाणी पुरेशा क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यासाठी शेजारी असणाऱ्या आणखी चार एकर जागेची आवश्यकता आहे. पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या सह कार्याने 'पीएमआरडीए'ने ही जागा अधिग्रहण करून उपलब्ध करून घ्यावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. मुळशी धरणाखालील मुळशी परिसरातील गावांसह पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण क्षेत्रातील पश्चिम भागात वाढत असणाऱ्या लोकसंख्येसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे. यादृष्टीने पुढील ३० वर्षांचा विचार करून मुळशी धरणाची उंची वाढवावी.

# निवडणुकीत महायुतीच्या जागावाटपाचे सर्वाधिकार कोणाला?

## आताच सर्व काही उघड करणार नाही : सुनील तटकरे

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महायुतीमधील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष यांची एकत्रित बैठक होईल. त्यानंतर दिल्ली येथे देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत बैठक होऊन मग लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीचे जागावाटप ठरेल.अशी स्पष्टोक्ती राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी बुधवारी केली. पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक झाल्यानंतर प्रदेशाध्यक्ष तटकरे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.ते म्हणाले की, महाराष्ट्रातील प्रत्येक लोकसभा मतदारसंघाची विद्यमान स्थिती, पक्षीय बलाबल आणि ताकद पाहून जागांची मागणी केली जाणार आहे. केंद्रीय



निवडणूक आयोग, त्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निर्णय तसेच आता पक्ष आणि निवडणूक चिन्ह मिळाल्यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दीकी, संभाजी ब्रिगेडचे अनेक कार्यकर्ते यांचा पक्षप्रवेश होत आहे. याशिवाय महाविकास आघाडीतील घटक पक्षांमधूनही राष्ट्रवादीमध्ये अनेक प्रवेश लवकरच होतील. त्यामुळे आम्ही घेतलेला निर्णय योग्य असल्याचे सिद्ध होत आहे. माझे बंधू आणि मी २०१४ पासून राजकारणातून वेगवेगळे झालो आहोत. त्यामुळे ते आताच सोडून गेले, अशा वदंता मुद्दामहून पसरवल्या जात आहेत. राजकारणामुळे कुटुंबात फूट पडणे हे भारतीय राजकारणात नवीन नाही, असेही तटकरे म्हणाले.शरद पवार यांनी पक्षाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांचा राजीनामा सर्वानुमते स्वीकृत करायचा. त्यांच्या जागी कोणाला नेमायचे आहे. त्याचे नावही एकमताने ठरविण्यात आले होते. सर्वकाही आनंदाने दिले असते त्याकरिता पक्ष आणि कुटुंब का फोडले?, असे म्हणणाऱ्यांना पक्षात राष्ट्रीय नेतृत्त्व करण्याची संधी दिली होती. त्यानंतरही पवार यांनी आपला राजीनामा मागे का घेतला?, कुठे आणि कधी काय-काय झाले याची सर्व माहिती मला आहे. मात्र, आताच सर्व काही उघड करणार नाही.

# अजित पवारांचा भाजपामध्ये वट राहिला नाही

## रोहित पवारांची अजित पवारांवर टीका

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

अजित पवारांचा भाजपा मधील वट कमी झाला असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे. आगामी लोकसभेला अजित पवार यांना केवळ चारच जागा मिळणार असल्याची चर्चा सुरू आहे. यावरून त्यांनी अजित पवार यांना टोला लगावला आहे. रोहित पवार हे पिंपरी- चिंचवडमध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेविका सुलक्षणा धर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार यांनी बारामतीमधील पक्ष कार्यालयाला भेट दिल्यानंतर रोहित पवार यांनी त्यांचे स्वागत केले आहे. रोहित पवार म्हणाले, अजित पवारांचा भाजपामध्ये वट आहे, असं वाटत होतं.



पण आता असं काही वाटत नाही. कारण त्यांना लोकसभेच्या चारच जागा मिळणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यांचा वट राहिला नाही. त्यांचा दिल्लीतील संपर्क कमी पडत आहेत. विधानसभेला देखील त्यांना वीस जागा मिळतील किंवा तुम्ही तुमच्या चिन्हावर लढू नका भाजपच्या चिन्हावर लढा, असं सांगितलं जाईल. लढायचं असेल तर वेगवेगळं लढा अशी परिस्थिती होणार आहे. लोकसभेला भाजपाला दोन्ही पक्षांची गरज आहे. तरीही अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचे महत्व कमी केले जात आहे. लोकसभेनंतर त्यांची किंमत काय होईल ते सांगता येत नाही.रोहित पवार पुढे म्हणाले, पार्थ पवार यांच्या उमेदवारी बाबत काहीही होऊ शकतं. राज्यसभेत त्यांना उमेदवारी देण्यात येणार होती असं कळलं. लोकसभेला ते उभे राहणार आहेत. शिरूरमध्ये शक्यता कमी आहे. बारामती आणि नगर येथून त्यांना उमेदवारी मिळू शकते, अशी शक्यता देखील रोहित पवार यांनी व्यक्त केली आहे. युगेंद्र पवार यांच्यावर भाष्य करताना रोहित पवार म्हणाले, युगेंद्र काय निर्णय घेतो ते महत्वाचं आहे. तो शरद पवार म्हणजे त्याच्या आजोबांना सहकार्य करत असेल तर चांगली गोष्ट आहे. युगेंद्र हा शरद पवार यांना साथ देत असेल तर त्याचं स्वागत आहे. शरद पवार यांनी अजित पवारांसाठी काय केलं हे आम्ही पाहिलं आहे. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला असं आम्हाला वाटत नाही. अजित पवार हे काय बोलतात याकडे आम्ही लक्ष देत नाही.दरम्यान रोहित पवार यांनी मराठा आरक्षणावर देखील मत व्यक्त केले. मराठा समाजाला दिलेल्या आरक्षणाबद्दल शंका उपस्थित होऊ लागली आहे. १६ टक्क्यांवरून १० टक्क्यांवर आरक्षण आलं आहे. लोकसभेला डोळ्यासमोर ठेऊन हा निर्णय घेतला आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. हे आरक्षण टिकवण्याचा आम्ही प्रयत्न करू असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. त्यांच्या तोंडून आलेला 'प्रयत्न' हा शब्द भीतीदायक आहे. सर्वसामान्य नागरिकांसाठी हा शब्द घातक आहे, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.अजित पवारांचा भाजपा मधील वट कमी झाला असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे. आगामी लोकसभेला अजित पवार यांना केवळ चारच जागा मिळणार असल्याची चर्चा सुरू आहे. यावरून त्यांनी अजित पवार यांना टोला लगावला आहे. रोहित पवार हे पिंपरी-चिंचवडमध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेविका सुलक्षणा धर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार यांनी बारामतीमधील पक्ष कार्यालयाला भेट दिल्यानंतर रोहित पवार यांनी त्यांचे स्वागत केले आहे. रोहित पवार म्हणाले, अजित पवारांचा भाजपामध्ये वट आहे, असं वाटत होतं. पण आता असं काही वाटत नाही. कारण त्यांना लोकसभेच्या चारच जागा मिळणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.यांचा दिल्लीतील संपर्क कमी पडत आहेत.

# परीक्षांच्या काळात वाहतूक नियोजन 'फेल'

## सात किलोमीटर साठी लागला तासभर

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पीएमपीएमएल बसने कोंढवे-धावडे ते कर्वे नगर असे सात किलोमीटर जाण्यास ३०- ३५ मिनीटे लागतात. वाहतूक कोंडीमुळे आज सुमारे एक तास लागला. बारावीच्या मंडळाच्या परीक्षा आज सुरुवात झाली. विद्यार्थ्यांना परीक्षेला मनःस्ताप सहन करावा लागला. त्याचे झाले असे की, बारावीचा आज पहिला पेपर होता परीक्षा विद्यार्थ्यांना मंडळाने दहा वाजता परीक्षा केंद्रावर हजर राहण्यास सांगितले आहे. आणि साडेदहा वाजता उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना देण्यात येते. त्यानुसार, उशीर होऊ नये म्हणून विद्यार्थी नऊ वाजता पीएमपीएमएल बसने निघाले. परंतू उत्तमनगर, शिवणे येथील नवभारत चौक, शिंदे पूल, न्यू अहिरे गाव, गणपती माथा, माळवाडीचा नवीन थांबा, चौधरी शाळेसमोरील थांबा, आंबेडकर चौक, या ठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती.यामुळे, विद्यार्थ्यांना कर्वेनगर येथील सिद्धिविनायक महाविद्यालयाच्या परीक्षा



केंद्रावर पोहोचण्यास ३५ मिनिटापेक्षा जास्त वेळ लागला. परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी सांगितले की, न्यूअहिरे गाव या ठिकाणी, मोठी वाहतूक कोंडी पहावयास मिळाली. बस व्यतिरिक्त कार दुचाकी, रिक्षा या वाहनाने देखील विद्यार्थी निघाले होते त्यांनाही केंद्रावर पोचण्यास वेळ लागला.गणपती माथा ते माळवाडी जुना बसथांबा, कालव्यावरील रस्ता चौक, माळवाडीचा युनियन बँके जवळील नवीन थांबा, चौधरी शाळेजवळ येथे देखील वाहतूक संथ झाली होती. वाहतूक पोलिस एक ठिकाणी होती. परीक्षेच्या पहिल्या दिवशी वाहतूक कोंडी झाल्यामुळे, वाहनांचा वेध संथ झाला होता. नेहमीपेक्षा आज जास्त वेळ लागला. विद्यार्थी परीक्षा केंद्रावर वेळेत पोहोचण्यासाठी कोंढवे धावडे ते डेक्कन वाहतुकीचे योग्य नियोजन करावे. असे मागणी पालक नितीन वांजळे यांनी केली आहे.याबाबत, वारजे वाहतूक विभागाचे सहायक पोलिस निरीक्षक दीपक काडबाणे यांनी सांगितले की, १० वी १२ वीच्या परीक्षा असल्यामुळे वरिष्ठांच्या सूचना आलेल्या आहेत. गणपती माथा येथे वाहतूक कोंडी झाली. याची माहिती मिळाली ती काढण्यात आली तसेच आम्ही चौकांमध्ये वाहतूक नियमन करीत होतो. उद्यापासून परीक्षेच्या दिवशी वाहतूक कोंडी होणार नाही याची काळजी घेतली जाईल तसेच सूचना सर्व कर्मचाऱ्यांना दिलेल्या आहेत. शिवणे येथील दांगटपाटील नगर ते कर्वे नगर हे अंतर दुचाकीवरून जाण्यासाठी देखील अर्धा तास वेळ लागला. शिवणे येथील शिंदे पूल, येथे नेहमीप्रमाणे वाहतूक कोंडी होती. गणपती माथा तेआंबेडकर चौकापर्यंत वाहतूक पूर्णपणे हळूहळू पुढे सरकत होती.